# THE MATADARS ACT, 1887.

## ( Bombay VI of 1887 )

## मतादार अधिनियम, १८८७.

## अनुक्रमणिका

प्रस्तावना.

कलमें.


| | | पान |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा ... ... ... ... ... ... ... | ५४७ |
| | व्याप्ति ... ... ... ... ... ... ... | ५४७ |
| | सुरुवात ... ... ... ... ... ... ... | ५४७ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | ५४७ |
| | मुंबई जमीन महसूल अधिनियमांत व्याख्या केलेले शब्दप्रयोग ... ... | ५४८ |
| ३. | सन १८७४ चा मुंबई अधिनियम ३ मध्यें फेरफार ... ... ... | ५४८ |
| ४. | रचना ... ... ... ... ... ... ... | ५४८ |

**नोंदणी वही**

| | | |
|---|---|---|
| ५. | मतादाराच्या सेवेच्या नोंदवहींत कोणत्या गोष्टी असाव्यात तें ... ... | ५४९ |
| ६. | पाटील पदावरील हक्क हा सामान्यतः प्रत्येक मतदार कुटुंबाकडे असला पाहिजे ; परंतु राज्य सरकारास, अनन्य हक्क एका मतादार कुटुंबाकडे असल्याचें जाहीर करण्याचा अधिकार आहे. | ५५० |
| ७. | मतादार ठरविणें ... ... ... ... ... ... | ५५० |
| ८. | प्रतिनिधि मतादार ठरविणें ... ... ... ... ... | ५५१ |
| ९. | मतादार मरण पावेल तेव्हां वारसाच्या नांवाची नोंद करणें ... ... | ५५१ |
| १०. | नोंदवहींत सुधारणा ... ... ... ... ... ... | ५५१ |

**सेवा**

| | | |
|---|---|---|
| ११. | मतादार म्हणून मतादार यांचीं कर्तव्यें व विशेष हक्क ... ... ... | ५५१ |
| १२. | मतादारांचीं कामें ज्या क्षेत्रास लागू होतात तें क्षेत्र विशिष्ट बाबतींत कमी करण्याचा अधिकार. | ५५२ |
| १३. | पाटील पदासाठीं आवश्यक असेलल्या, त्या जागेवर काम करणाऱ्या इसमांची संख्या कलेक्टरनें ठरविणें. | ५५२ |
| १४. | ज्या कुटुंबाचे हक्क ठरविले आहेत अशा कुटुंबाच्या प्रतिनिधीमध्यें पदावरील हक्क निहित होणें. | ५५२ |
| १५. | इतर प्रत्येक बाबतींत पदावरील हक्क मतादार कुटुंबांनीं आळीपाळीनें उपभोगणें ... | ५५२ |
| १६. | आळीपाळीचा क्रम ठरविणें ... ... ... ... ... | ५५२ |
| | बहुसंख्य मतादारांचे एकमत न झाल्यास कलेक्टरानें चिठ्ठ्या टाकून क्रम ठरविणें ... परंतुक | ५५३ |
| १७. | मतादारांनी (पाटील) पदावर काम करणाऱ्या इसमाची निवड केव्हां करावयाची तें ; मतादारांनी त्या जागीं काम करणाऱ्या इसमाची निवड करण्यांत कसूर केल्यास, पदावरील हक्क प्रतिनिधि मतादारामध्यें निहित होणें. | ५५३ |
| १८. | राज्य सरकारनें निवडणुकीबद्दलचे नियम विहित करणें ... ... ... | ५५३ |

कलमें. पान

१९. सामान्यत: प्रतिनिधि मतादारानें जातीनें त्या जागीं काम केलें पाहिजे ... ५५४

एखाद्या प्रतिनिधि मतादारानें जातीनें त्या जागीं काम करण्यास नकार दिल्यास, पदावरील हक्क दुसऱ्या इसमाकडे जाणें. ५५४

प्रतिनिधि मतादारास इतर नोकरी करण्यास केव्हां प्रतिबंध होईल तें ... ... ५५४

गावांत राहण्यांत कसूर केल्यास ... ... ... ... ...

२०. प्रतिनिधि मतादारानें आपल्या जागीं दुसऱ्या इसमास केव्हां नेमावयाचें तें ... ५५४

जागीं नेमलेल्या (दुय्यम) इसमास काढून टाकणें ... ... ...

२१. प्रतिनिधि मतादारातर्फे जेव्हां त्याचे जागीं दुय्यम इसमाची नेमणूक करावयाची असेल तेव्हांची कार्यरीति. ५५५

२२. कलेक्टरनें दुय्यम इसमाची नेमणूक केव्हां करावयाची तें ... ... ... ५५५

दुय्यम इसम हा सामान्यत: मतादार कुटुंबाचा सदस्य असला पाहिजे ... ... ५५५

२२-अ. अपात्र प्रतिनिधि मतादारास दुय्यम इसम नेमण्याचा अधिकार नसेल तेव्हांची कार्यरीति. ५५६

२३. वैधरित्या अपात्र असलेल्या मतादाराच्या वतीनें मालकास काम करण्याचा अधिकार ५५

२४. केवळ एकच एक असलेल्या मतादाराचा व त्या जागीं काम करणाऱ्या निवडलेल्या इसमाचा पदावधि. ५५

२५. पदावर हक्क असणारा प्रतिनिधि मतादार याचा, निवडणूक न झाल्यास, पदावधि ... ५५६

२६. दुय्यम इसमास त्याच्या पदावरील मूळ इसमाच्या पदाच्या मुदतीपर्यंतच नेमणें ... ५५७

२७. प्रतिनिधी मतादाराच्या पदावधींतील शेवटच्या वर्षांत, त्या जागी काम करणारा इसम न बदलणें. ५५७

दुसरा इसम नेमणें आवश्यक असेल असा प्रसंग उद्भवल्यास, पद रिकामें झाल्याचें समजण्यांत यावें. ५५७

२८. मामलतदार किंवा महालकरी यांनी त्या जागीं काम करण्यासाठीं इसम तात्पुरते नेमणें ५५८

२९. त्या जागीं काम करणाऱ्या इसमास, त्यांच्या गैरहजेरींत किंवा आजारीपणांत दुय्यम इसम ठेवण्याचा अधिकार. ५५८


**पाटील पदासाठींच्या अपात्रता**


३०. पदासाठीं कोणते इसम अपात्र समजण्यांत यावें तें ... ... ... ५५८


**शास्ति**


३१. मतादार व त्या जागीं काम करणाऱ्या लोकांस दंडाची शिक्षा देणें आणि त्याजागीं काम करणाऱ्या इसमास तात्पुरतें कामावरून दूर करणें किंवा पदावरून काढून टाकणें. ५५९

पदावरून काढून टाकलेल्या प्रतिनिधि मतादाराच्या अपात्रता ... ... ५५९

पदावरून काढून टाकल्याच्या बाबतींत प्रतिनिधि मतादाराचे हयातीपर्यंतचा हितसंबंध जप्त करणें. ५६०

३२. त्या जागीं काम करणाऱ्या इसमाची फौजदारी खटल्यांतील जबाबदारी व चौकशी व इन्साफ होईपर्यंत त्यास तात्पुरतें कामावरून दूर करणें. ५६०

# सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ *

## [मतादार अधिनियम, १८८७]

[३० जानेवारी, १८८८.]

ह्या अधिनियमांत पुढील अधिनियमान्वयें सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १८९० चा मुंबई अधिनियम ३.

सन १९१० चा मुंबई अधिनियम ३.

सन १९१५ चा मुंबई अधिनियम ३.

सन १९२२ चा मुंबई अधिनियम ८.

सन १९३६ चा मुंबई अधिनियम २४.

ह्या अधिनियमांत भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश, याअन्वयें अनुकूलन व रूपभेद करण्यांत आले.

## मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम ह्याचा मतादारांशीं ज्या मर्यादेपर्यंत संबंध आहे त्या मर्यादेपर्यंत त्याची सुधारणा करणारा अधिनियम

याअर्थी मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम याचा कांहीं भाग मतादारांना अयोग्य असल्याचें आढळून आहे ; म्हणून उक्त अधिनियमांत सुधारणा करणें व मतादारांच्या सेवेचे नियमन करण्यासाठीं व उपबंध करणें इष्ट आहे ; त्याअर्थी पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :— प्रस्तावना.

१. ह्या अधिनियमास मतादार अधिनियम, १८८७ असें म्हणावें. लघु संज्ञा

तो अहमदाबाद, खेडा, भडोच व सुरत या जिल्ह्यांना लागू आहे ; परंतु राज्य सरकारास, वेळोवेळीं राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या अधिसूचनेद्वारें, त्याचें उपबंध, पंचमहाल जिल्ह्यांतील कोणत्याहि गांवास लागू करण्याचा अधिकार आहे. व्याप्ति.

तो तात्काळ अंमलांत येईल ; परंतु, पाटलाच्या ज्या कोणत्याहि पदास हा अधिनियम लागू होत आहे त्या पदावर मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम किंवा सन १८४३ चा अधिनियम क्रमांक ११ (मुंबई इलाख्यांतील वंशपरंपरागत पदांच्या सेवेचें नियमन करणारा अधिनियम) यांच्या उपबंधान्वयें करण्यांत आलेली व चालू असलेली प्रत्येक नेमणूक हीं— सुरुवात.

(अ) हा अधिनियम केला नसतां तर असें पद रिकामें होईपर्यंत किंवा हा अधिनियम अंमलांत आल्या-पासून दोन वर्षांची मुदत संपेपर्यंत, जी कोणतीहि मुदत अगोदर संपेल त्यावेळेपर्यंत, अथवा

(ब) आणखी आदेश मिळेपर्यंत चालू ठेवण्यांत यावी, म्हणून केलेल्या नेमणुकीच्या बाबतींत कलेक्टर निदेश देईल त्यावेळेपर्यंत ;

चालू राहील आणि उपरिनिर्दिष्ट अशा कोणत्याहि नेमणुकीऐवजी ह्या अधिनियमान्वयें केलेली नवीन नेमणूक ही, जेव्हां पूर्वीची नेमणूक स्थगित होईल त्यावेळेपासूनच केवळ अंमलांत आली आहे असें समजलें पाहिजे.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत —

(१) "मतादार कुटुंब" या संज्ञेचा अर्थ, गांव पाटलाचे पद किंवा त्या पदाशीं सामान्यतः संबंधित असलेलीं कामें पार पाडण्यांत किंवा अधिकार चालविण्यांत ज्या कुटुंबाचा वंशपरंपरागत कांहीं हिस्सा असेल ते कुटुंब, असा समजावा ; व्याख्या

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(२) "मता" या संज्ञेचा अर्थ, मतादार कुटुंब म्हणून अशा कुटुंबामध्यें निहित असलेले एकूण हक्क विशेषाधिकार व जबाबदाऱ्या, असा समजावा ;

(३) "मतादार कुटुंबाचा सदस्य" या संज्ञेत, ज्या स्त्रीचा किंवा स्त्रियांवतीनें हक्क सांगणाऱ्या ज्या इसमाचा, मता किंवा त्याचा भाग किंवा त्यामधील हितसंबंध यांवरील वारसा क्रम सन १८८६ चा अधिनियम ५, कलम २ अन्वयें (सन १८७४ चा मुंबई अधिनियम ३ मध्यें सुधारणा करणारा अधिनियम) कुटुंबाच्या पुरुष सदस्यानंतर येत असेल अशी स्त्री किंवा स्त्रियांवतीनें हक्क सांगणारा असा इसम यांचा समावेश होणार नाहीं ;

(४) "मतादार" या संज्ञेचा अर्थ, मतादार कुटुंबाचा असा सदस्य ज्याचें नांव कलम ५ अन्वयें ठेवलेल्या नोंदवहींत नमूद केलें आहे असा समजावा व तींत मतादार प्रतिनिधीचा समावेश होतो;

(५) "मतादार प्रतिनिधि" या संज्ञेचा अर्थ, मतादार कुटुंबाच्या ज्या सदस्याचें नांव, उक्त नोंदवहींत मतादार प्रतिनिधि म्हणून नमूद केलें असेल असा सदस्य, असा समजावा;

(६) "वरिष्ठ वारस" या संज्ञेचा अर्थ, ज्यानें वारसाचा हक्क जन्मामुळें, लग्नामुळें किंवा अन्य रीतीनें प्रथम संपादन केला आहे असा वारस, असा समजावा;

मुंबई जमीन-महसूल अधिनियमांत व्याख्या केलेले शब्दप्रयोग.

(७) मुंबई जमीनमहसूल अधिनियम, १८७९ यांत व्याख्या केलेला व ज्याची यांत यापुढें व्याख्या केली नाहीं असा कोणताहि शब्द किंवा शब्दप्रयोग याचा अर्थ उक्त अधिनियमांत त्यांना जो अर्थ दिला अ तोच अर्थ असेल.

(८) ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठीं मतादाराचा वारस कोण आहे हें ठरवितांना आनुवंशिक ज्येष्ठपणाच्या वारसाबाबत जे नियम आहेत ते नियम मतादारकुटुंबांत अस्तित्वांत आहेत असें गृहीत धरण्यांत येईल.

सन १८७४ चा मुंबई अधिनियम ३ मध्यें फेरफार.

३. सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ [ सन १८७४ चा मुंबई अधिनियम ३ ची सुधारणा करणारा अधिनियम ] याअन्वयें सुधारणा करण्यांत आलेला मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम आणि शेवटी उल्लेख केलेल्या अधिनियमाचे कलम २ हे, मतादारांना लागूं करतांना, "वतन" या संज्ञेचा अर्थ, गांवचे सर्व आणि प्रत्येक मता असा समजावा आणि मतादार कुटुंबाचा सदस्य वतनदार म्हणून समजण्यांत आला पाहिजे आणि अशा रीतीनें सुधारणा केलेला उक्त अधिनियम पुढील फेरफारांस अधीन राहून वाचण्यांत आला पाहिजे :—

(१) कलमें २४ ते ३१ (दोन्ही धरून), कलमें ३६ ते ५९ (दोन्ही धरून), कलमें ६१, ६२, ६७, ६९, ७१ व कलम ७३ ची कंडिका (२) आणि भाग ६ किंवा भाग ७ यांन्वयें दिलेल्या आदेशांशीं कलम ७३ याचा ज्या मर्यादेपर्यंत संबंध आहे त्या मर्यादेपर्यंत कलम ७३ हें, किंवा उक्त अधिनियमाचे कलम ५८ आणि कलम ४ मधील "वतनदार" व "वतनदार प्रतिनिधि" यांच्या व्याख्या रद्द करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे;

(२) कलमें ३३ व ३४ मधील "हा अधिनियम अंमलांत आल्यावर" या शब्दांचा अर्थ प्रस्तुत अधिनियम अंमलांत आल्यावर असा लावण्यांत आला पाहिजे, आणि "नोंदलेला वतनदार प्रतिनिधि" आणि "वतनदार" हे शब्द अनुक्रमें जेथें जेथें येतील तेथें तेथें त्या एवजी "मतादार" हा शब्द दाखल करण्यांत आला पाहिजे;

(३) कलम ६० मधील पहिल्या चार शब्दांऐवजी, "ज्यावेळीं तात्पुरतें काम करण्यास निवडून देण्यांत आलेला कोणताहि इसम किंवा मतादार प्रतिनिधि" हे शब्द दाखल करण्यांत आल्याचें समजण्यांत आलें पाहिजे.

४. निकटपूर्वीच्या कलमांतील उपबंधांस अधीन राहून, हा अधिनियम मुंबई वंशपरंपरागत पद अधि- नियम याबरोबर वाचण्यांत आला पाहिजे. रचना.

## नोंदवही

५. ज्या जमिनी व भत्ते यामुळें सेवा करण्याची जबाबदारी अजून अस्तित्वांत आहे अशा जमिनी व भत्ते यांच्या, मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियमाच्या कलम ६५ अन्वयें ठेवलेल्या नोंदवहींत, कलेक्टरानें, ज्या गांवांत मतादार असतील अशा प्रत्येक गांवांसाठीं पुढील गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत — मतादारांच्या सेवेच्या नोंदवहींत कोणत्या गोष्टी असतील त्याबाबत.

(अ) कलेक्टरच्या दप्तरांत स्वतंत्रपणें मान्यता दिलेल्या गांवांतील वेगवेगळ्या मतादार कुटुंबांची संख्या ;

(ब) ज्या मतादार कुटुंबास पटेलाचें पद धारण करण्याचा हक्क असेल अशा प्रत्येक मतादार कुटुंबाच्या प्रतिनिधि मतादाराचें नांव;

(क) ज्या इसमाचें नांव कलम ७ किंवा ९ अन्वयें नोंदवहींत नमूद करण्याविषयीं कलेक्टरनें निदेश दिला असेल अशा इतर कोणत्याहि इसमाचें नांव;

(ड) जेव्हां एकांहून अधिक प्रतिनिधि मतादार असतील तेव्हां, निवडणूक करून तात्पुरत्या इसमाची नेमणूक न झाल्यास, ज्या क्रमाक्रमानें पाटलाच्या पदावरील हक्क, उक्त प्रतिनिधि मतादारामध्यें निहित होईल तो क्रम ;

(इ) एकाच वेळीं तात्पुरत्यारीत्या पाटील म्हणून काम करण्यास आवश्यक असलेल्या इसमांची संख्या;

(फ) प्रत्येक मतादार कुटुंबानें धारण केलेल्या सेवेदाखलच्या जमिनींचें त्यांचें क्षेत्र, त्यांचा भूमापन क्रमांक व त्यावरील आकारणी आणि कांहीं उक्ता धारादेण्याजोगा असेल तर तो आणि राज्य सरकारनें दुसऱ्याचें नांवें केलेल्या जमीन महसुलाची निव्वळ रक्कम या सर्व गोष्टींचा उल्लेख करणारें त्यांचें वर्णन ;

(ग) प्रत्येक मतादार कुटुंबानें, जर कांहीं रोख रक्कम किंवा इतर भत्त्याच्या स्वरूपांत रोख रक्कम धारण केली असेल तर ती रक्कम व ते भत्ते व त्यांचे प्रकार.

(ह) मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, कलम २३ अन्वयें तात्पुरतें काम करणारे इसम यांच्या उपलब्धीसाठीं नांवें करून दिलेली वतन मालमत्ता किंवा नफा;

(आय्) राज्य सरकार वेळोवेळीं निदेश देईल असा इतर तपशील उक्त नोंदवहींत, हचा अधि- नियमाच्या किंवा मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियमाच्या उपबंधानुसार, नोंदवहींत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि तपशीलांत जेव्हां कोणताहि बदल करण्यांत येईल तेव्हां त्या नोंदवहींत वेळोवेळीं सुधारणा करण्यांत आल्या पाहिजेत.

पाटील पदावरील हक्क हा सामान्यतः प्रत्येक मतादार कुटुंबाकडे असेल; परंतु राज्य सरकारास, त्या पदा-बाबतचा हक्क एका मतादार कुटुंबाकडे असल्याचे ठरविण्याचा अधिकार आहे.

६. कलेक्टरच्या दप्तरांत, ज्या कोणत्याहि गांवांतील दोन किंवा अधिक निरनिराळ्या मतादार कुटुंबाना स्वतंत्रपणें मान्यता दिली असेल त्या बाबतींत अशा प्रत्येक गांवांतील पाटील-पद धारण करण्याचा हक्क हा, सामान्यतः उक्त कुटुंबापैकीं प्रत्येक कुटुंबाकडे आहे असें समजण्यांत आलें पाहिजे :

परंतु, राज्य सरकारास, कोणत्याहि गांवांतील पदावधीचा गतकालीन इतिहास लक्षांत घेऊन व ज्या परिस्थितींत गांव स्थापन झालें त्या परिस्थितीची ज्या मर्यादेपर्यंत माहिती असेल तेथवर तिचा विचार केल्यानंतर राज्य सरकारास तसें करणें न्याय्य वाटल्यास अशा गांवांतील पाटील-पदावरील हक्क हा अशा कुटुंबापैकीं, बाकी कुटुंबाना वगळून अशा एक किंवा एकाहून अधिक कुटुंबांकडे आहे असें राज्य सरकारनें ठरविणें हे त्याच्या अधिकारांत असेल आणि असा हक्क राज्य सरकार अशा घोषणेद्वारें ठरवील त्या क्रमानुसार निहित होईल. आणि अशी प्रत्येक घोषणा ही त्याअन्वयें निश्चित केल्यानुसार हक्कांचा निर्णायक पुरावा म्हणून समजली पाहिजे.

मतादार ठरविणें.

७. कलेक्टरनें, सन १८६६ या वर्षानंतर राज्य सरकारच्या आदेशान्वयें केलेल्या मतादाराच्या कोणत्याहि यादींत असणाऱ्या, मतादार कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याचें नांव कलम ५ अन्वयें तयार केलेल्या नोंदवहींत नमूद केलें पाहिजे ;

परंतु,—

(अ) जर कोणत्याहि गांवासाठीं अशी यादी अस्तित्वांत नसेल किंवा हा अधिनियम अंमलात येईल तेव्हां कोणत्याहि वेळीं, अशा कोणत्याहि नोंदणीच्या पूर्णतेबद्दल किंवा अचूकतेबद्दल जर कोणताहि वाद असेल तर कलेक्टरनें संक्षिप्त चौकशी केली पाहिजे आणि मतादार कुटुंबाचा जो सदस्य १८६७ या वर्षापूर्वीच्या दप्तरामध्यें ज्या मतादार कुटुंबाबद्दल अशी यादी किंवा नोंद नसेल किंवा असा वाद ज्या मतादार कुटुंबाशी संबंधित असेल अशा कुटुंबाचा मतादार म्हणून मान्यता मिळालेला आहे असें कलेक्टरास वाटेल त्या मतादार कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याचें नांव नोंदणी-पुस्तकांत नमूद केलें पाहिजे ;

(ब) मागील उपबंधापैकीं कोणत्याहि उपबंधानुसार ज्याचें नांव नोंदवहींत नमूद केलें पाहिजे असा कोणताहि इसम मरण पावला असेल तर वारसाक्रमानुसार त्याचेनंतरच्या वारसाचें नांव, किंवा जर समान पर्यायाचे दोन किंवा अधिक वारस असतील तर, सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, सन १८७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ची सुधारणा करणारा अधिनियम कलम २ च्या उपबंधांस आधीन राहून, मयत इसमाचें नांवाऐवजी वरिष्ठ वारसाचें नांव, नोंदवहींत नमूद केलें पाहिजे.

८. (१) ज्या मतादार कुटुंबाकडे पाटील-पद धारण करण्याचा हक्क आहे अशा प्रत्येक मतादार कुटुंबाचा, प्रतिनिधि मतादार म्हणून, एका मतादाराचें नांव, उक्त नोंदवहींत नमूद केलें पाहिजे. प्रतिनिधि मतादार ठरविणें.

(२) ज्या मतादार कुटुंबांचा केवळ एकच मतादार आहे अशा प्रत्येक मतादार कुटुंबासाठीं उक्त मतादार हा प्रतिनिधि मतादार असला पाहिजे.

(३) जर अशा कोणत्याहि मतादार कुटुंबाचे दोन किंवा अधिक मतादार असतील तर कलेक्टरानें, हा अधिनियम संमत झाल्यानंतर शक्यतो लवकर, मतादार कुटुंबाचा जो प्रमुख असल्याचें त्यास वाटेल असा उक्त मतादारांपैकीं एक मतादार, मतादार कुटुंबाचा प्रतिनिधि मतादार म्हणून उक्त नोंदवहींत नमूद केला पाहिज.

९. प्रतिनिधि किंवा इतर मतादार मरण पावल्यास ती घटना ग्राम अधिकाऱ्यांनी कलेक्टरास कळविली पाहिजे आणि वारसा हक्क मिळणाऱ्या त्याच्या नंतरच्या वारसाचें नांव किंवा समान पर्यायाचे दोन किंवा अधिक वारस असतील तर, सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, (१८७४ चा मुंबई अधिनियम ३ ची सुधारणा करणारा अधिनियम) कलम २ चे उपबंध आणि ह्या अधिनियमाचे कलम ६ च्या परंतुकान्वयें केलेली कोणतीहि घोषणा, यांस अधीन राहून, त्याचे मयत इसमाच्या नांवाऐवजी वरिष्ठ वारसाच्या नांवाची नोंद केली पाहिजे ; मतादार मरण पावेल तेंव्हां वारसाच्या नांवाची नोंद करणें.

परंतु, मयत मतादार हा एकमेव प्रतिनिधि मतादार नसेल अशा कोणत्याहि बाबतींत, जर वारसा हक्क मिळणारा त्याचे नंतरचा वारस हा मयत मतादार ज्या मतादार कुटुंबाचा होता त्या मतादार कुटुंबाच्या शाखेचा सदस्य नसेल परंतु त्याच गांवचा दुसरा मतादार असेल किंवा त्याच गांवच्या दुसऱ्या मतादाराच्या शाखेचा सदस्य असेल तर नोंदवहींत मयत मतादाराच्या नांवापुढें नमूद केलेला हिस्सा हा —

(अ) मयत मतादार हा ज्या मूळ मतादाराचा वंशज होता त्या मूळ मतादाराचा त्या गांवचा केवळ एकच बाकी असलेला प्रतिनिधि मतादार असेल तर त्या राहिलेल्या प्रतिनिधि मतादाराकडे गेला पाहिजे,

(ब) जर असे बाकी असलेले प्रतिनिधि मतादार एकाहून अधिक असतील तर, तो हिस्सा अशा बाकी राहिलेल्या प्रतिनिधी मतादारांमध्यें त्यांच्या हिश्यांप्रमाणें विभागून दिला पाहिजे, आणि नोंदणी पुस्तकांत त्यानुसार सुधारणा केली पाहिजे.

१०. जर कोणत्याहि इसमानें, कोणत्याहि वेळीं, वारसा हक्काचें प्रमाणपत्र, किंवा सक्षम न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश सादर करून, कलेक्टरनें ज्याच्या नांवाची नोंद करण्यासाठीं आदेश दिला आहे अशा इसमाचे ऐवजी, कलम ९ किंवा कलम ७ (ब) अन्वयें त्याच्या नांवाची नोंद होण्यास तो पात्र आहे अशी कलेक्टराची खात्री करून दिल्यास, कलेक्टरनें नोंदवहींतील नोंद त्याप्रमाणें दुरुस्त करवून घेतला पाहिजे. नोंदवहींत सुधारणा.

## सेवा

११. कलेक्टरकडून ती फर्माविण्यांत आलें असतां प्रत्येक मतादार हा, मतादाराकडून रूढिनुसार जीं कर्तव्यें पार पाडण्यांत येतात तीं कर्तव्यें पार पाडण्यास बांधलेला असेल आणि त्यांना गांव-जमिनी व महसूल यांचा गोषवारा यांवर आणि रूढिनुसार मतादारांनी ज्यावर सही केली पाहिजे असें गांवासंबंधीचे इतर कागदपत्र यांवर सही करण्याचा विशेष अधिकार असेल. मतादार म्हणन मतादार यांचीं कर्तव्यें व विशेष हक्क.

मतादारांचीं कामें ज्या क्षेत्रास लागू होतात तें क्षेत्र विशिष्ट बाबतींत कमी करण्याचा अधिकार.

१२. ज्या गांवांत मतादार आहेत अशा कोणत्याहि गांवाच्या हद्दींत एखादें नवीन गांव किंवा लहानसें गांव बनविण्यांत आलें किंवा यानंतर कोणत्याहि वेळीं बनविण्यांत आलें तर राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन, उक्त मतादारांचीं कामें ज्या क्षेत्रांस लागू होतात त्या क्षेत्रांतून, असें नवीन गांव किंवा लहानसें गांव यांच्या हद्दी वगळणें हें कलेक्टरच्या अधिकारांत असेल.

पाटीलपदासाठीं आवश्यक असलेल्या, त्या जागेवर काम करणाऱ्या इसमांची संख्या कलेक्टरनें ठरविणें.

१३. कलेक्टर यांस स्वविवेकानुसार, वेळोवेळीं, प्रत्येक पाटील-पदाचीं कर्तव्यें योग्य रीतीनें पार पाडण्यासाठीं, आवश्यक असतील अशी त्या जागीं काम करणाऱ्या इसमांची संख्या ठरविण्याचा अधिकार आहे.

ज्या कुटुंबांचे हक्क ठरविण्यांत आले आहेत अशा कुटुंबांच्या प्रतिनिधिमध्यें पदावरील हक्क, निहित होणें.

१४. राज्य सरकारनें कलम ६ अन्वयेची घोषणा ज्या गांवांत केली असेल अशा प्रत्येक गांवांत, पाटील पदावरील हक्क हा, त्या घोषणेन्वयें ज्या कुटुंबाचे हक्क घोषित करण्यांत आले असतील अशा प्रत्येक कुटुंबाच्या प्रतिनिधीमध्यें, इतर सर्व मतादारांना वगळून, घोषणेंत जो क्रम ठरविण्यांत आला असेल त्या क्रमाप्रमाणें निहित असेल.

इतर प्रत्येक बाबतींत पदावरील हक्क मतादार कुटुंबानी आळीपाळीने उपभागणें.

१५. इतर प्रत्येक गांवांत, पाटीलपदावरील हक्क हा, त्या पदासाठीं पात्र असतील अशा प्रत्येक मतादार कुटुंबामध्यें आळीपाळीने निहित असेल.

आळीपाळीचा क्रम ठरविणें.

१६. उक्त कुटुंबामध्यें ज्या क्रमानुसार उक्त हक्क निहित होईल तो क्रम ठरविण्याच्या कारणासाठीं, कलेक्टरानें, हा अधिनियम अंमलांत आल्यानंतर शक्यतो लवकर, लेखी नोटीस देऊन, गांवाच्या मतादारांना त्याचे समक्ष जमा होण्यासाठीं फर्माविले पाहिजे.

उक्त नोटिसीस अनुसरून उपस्थित असलेल्या बहुसंख्य मतादारांना आळीपाळीचा कोणताहि क्रम मान्य न झाल्यास, कलेक्टरानें, त्यास योग्य वाटेल त्या रीतीनें, जमा झालेल्या मतादारांच्या उपस्थितींत चिठ्ठ्या टाकून असा क्रम ताबडतोब ठरविला पाहिजे. बहुसंख्य मतादारांचे एकमत न झाल्यास कलेक्टरानें चिठठ्या टाकून क्रम ठरविणें.

परंतु, मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियमान्वयें केलेली कोणतीहि कार्यवाही चालू असतांना, त्याच कुटुंबाच्या प्रतिनिधि वतनदाराच्या सेवेसाठीं आळीपाळीचा क्रम जर चिठ्ठ्या टाकून किंवा पक्षकारांच्या सहमतानें पूर्वीच ठरविण्यांत आला असेल तर अशा रीतीनें ठरविलेला क्रम, निकट पूर्वीच्या कलमाच्या प्रयोजनांसाठीं अंमलांत राहील. परंतुक.

१७. ज्या गांवास कलम १५ लागू होत आहे अशा कोणत्याहि गांवांत पाटलाचें पद रिकामें झाल्यावर किंवा तसें तें रिकामें होईल तेव्हां, कलम ३०, पोट-कलम २ अन्वयें ज्यांचा मत देण्याचा हक्क काढून घेतला नाही अशा गांवच्या मतादारास रिकामी जागा भरून काढण्यासाठीं, ज्या मतादाराची पदावरील हक्क उपभोगण्याची पाळी असेल अशा मतादार कुटुंबाच्या एखाद्या मतादारांस निवडून देण्याचा अधिकार आहे. मतादारांनी (पाटील) पद वर काम करणाऱ्या इसमाची निवड केव्हां करावयाची तें.

या बाबतींत कलेक्टरकडून विहित करण्यांत येईल अशा वाजवी मुदतींत, जर उक्त मतादारांपैकीं बहुसंख्य मतादारांनी, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे रिकामी जागा भरण्यासाठीं मतादार कुटुंबाचा एखादा सदस्य नेमण्यांत कसूर केल्यास किंवा नेमण्यांत आलेला इसम अपात्र ठरल्यास, पदावरील हक्क हा उक्त कुटुंबाच्या प्रतिनिधि मतादारामध्यें निहित झाला पाहिजे. मतादारांनी त्या जागी काम करणाऱ्या इसमाची निवड करण्यांत कसूर केल्यास, पदावरील हक्क प्रतिनिधि मतादारा मध्यें निहित होणें.

१८. निकटपूर्वीच्या कलमान्वयें करण्यांत येणारी निवडणूक ही राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचने-द्वारें, वेळोवेळीं, याबाबतींत विहित करील अशा नियमानुसार करण्यांत आली पाहिजे. राज्य सरकारनें निवडणूकी बद्दलचे नियम विहित करणें.

सामान्यत: प्रतिनिधी मतदारानें जातीने त्या जागीं काम केले पाहिजे.

१९. कलेक्टरनें, कलम १४ किंवा १७ अन्वयेंचा पदावरील हक्क ज्या प्रतिनिधि मतादारामध्यें निहित असेल अशा प्रत्येक प्रतिनिधि मतादारास, जर तो त्या पदासाठीं अपात्र नसेल तर, जातीनें त्या जागीं काम करण्यास सामान्यत: भाग पाडलें पाहिजे; परंतु कलेक्टरास, जर त्यास योग्य वाटलें तर, त्यानें (अशा इसमानें जातीनें सेवा करणें आवश्यक नाहीं असें ठरविण्याचा अधिकार आहे.

एखाद्या प्रतिनिधी मतादारास जातीने त्या जागी काम करण्यास नकार दिल्यास, पदावरील हक्क दुसऱ्या इसमाकडे जाणें.

कलम १५ ज्या गांवास लागू आहे अशा कोणत्याहि गांवांत, पदावरील हक्क उपभोगण्याची ज्याची पाळी असेल अशा कुटुंबाच्या प्रतिनिधी मतादारानें कलेक्टरने त्यास जातीने त्याजागीं काम करण्यास निदेश दिला असतां, जर नकार दिला तर उक्त हक्क उपभोगण्याची पाळी ही, आळीपाळीच्या ठरविलेल्या क्रमांतील, त्यानंतरच्या मतादार कुटुंबाकडे गेली पाहिजे.

प्रतिनिधि मतदाराने इतर नोकरी करण्यांस केव्हां प्रतिबंध होईल ते गावांत राहण्यास कसूर करणें.

एखाद्या प्रतिनिधि मतादारानें, त्या जागीं काम करीत असतांना, कलेक्टरच्या मतें जी नोकरी पाटील पदाचीं कर्तव्यें योग्य रीतीनें पार पाडण्यासाठीं अयोग्य आहे अशी इतर कोणतीहि नोकरी सोडण्यास नकार दिला किंवा ज्या गांवासाठीं त्याची नेमणूक झाली अशा गावांमध्यें राहाण्यास कलेक्टरनें त्यास भाग पाडलें सतां, अशा गावांत राहण्यांत त्यानें कसूर केली असेल तर त्यानें जातीने त्या जागीं काम करण्यास नकार दिला आहे असें समजलें पाहिजे.

प्रतिनिधि मतादारान आपल्या जागीं दुसऱ्या इसमास केव्हां नेमावयाचे तें.

२०. (अ) त्या पदासाठीं जो अपात्र ठरला आहे किंवा जो जातीनें त्या जागीं काम करीत असतां पदासाठीं अपात्र होईल अशा प्रतिनिधि मतादारास ; आणि

(ब) जो पदासाठीं अपात्र नसूनहि ज्याची जातीनें त्या जागीं काम करण्याची इच्छा नसेल किंवा त्या जागीं काम चालू ठेवण्याची इच्छा नसेल अशा प्रतिनिधि मतादारास, कलेक्टरची परवानगी घेऊन ; आणि

(क) जेव्हां एक किंवा त्याहून अधिक इतर मतादारांची आवश्यकता असेल तेव्हां ज्याचा जातीनें त्या जागीं काम करण्याचा हेतू असेल किंवा पूर्वीच त्या जागीं काम करीत असेल अशा केवळ एकच प्रतिनिधि मतादारास ;

कोणत्याहि वेळीं, त्याच्या जागी दुसऱ्या इसमास नेमण्याचा अधिकार आहे.

परंतु, कलम ३०, पोट-कलम (१) कंडिका (फ), (ग) किंवा (ह) अन्वयें जो प्रतिनिधि मतादार अपात्र झाला आहे त्यास आपल्या जागीं दुसऱ्या इसमास, नेमण्याचा अधिकार असणार नाहीं.

प्रतिनिधि मतादाराच्या विनंतिवरून कलेक्टरास, जर अशी विनंति करण्यास योग्य कारणें आहेत असें त्यास वाटेल तर, त्यानें आपल्या ऐवजी नेमलेल्या इसमास पदावरून काढून टाकण्याचा अधिकार आहे. मतादारानें आपल्या ऐवजी नेमलेल्या इसमास काढून टाकणें.

२१. जेव्हां प्रतिनिधी मतादारास आपल्या जागीं इतर इसमाची नेमणूक करणें असेल तेव्हां, कलेक्टरनें लेखी नोटीस देऊन, उक्त नोटीस बजाविल्याचे तारखेपासून वीस दिवसांचे आंत त्यास आपल्या जागीं इतर इसम म्हणून योग्य इसमाची नेमणूक करण्यास फर्माविले पाहिजे. प्रतिनिधी मतादाराच्या जेव्हां आपल्या जागीं इतर इसमाची नेमणूक करावयाची असेल तेव्हाची कार्यरीति.

उक्त मुदतीचे आंत कोणत्याहि इसमास नेमण्यांत प्रतिनिधि मतादारानें कसूर केली असतां किंवा जर त्यानें नेमलेला इसम हा त्याच गांवच्या मतादार कुटुंबाचा सदस्य नसेल किंवा पदासाठीं अपात्र असेल तर कलेक्टरास स्वविवेकानुसार, नेमणुकीची मुदत आणखी दहा दिवसांसाठीं वाढविण्याचा अधिकार आहे.

जर विहित केलेल्या वीस दिवसाच्या मुदतींत किंवा जेव्हां कलेक्टर मुदत वाढवील तेव्हा अशा वाढविलेल्या मुदतींत जर प्रतिनिधि मतादारानें कोणताहि इसम नेमला नाहीं किंवा त्यानें नेमलेला इसम हा त्याच गांवच्या मतादार कुटुंबाचा सदस्य नसेल किंवा पदासाठीं अपात्र असेल तर पदावरील हक्क उपभोगण्याची पाळी हीं, कलम १४ किंवा कलम १५ गांवास ज्याप्रमाणें लागू होईल त्याप्रमाणें ठरविलेल्या आळीपाळीच्या क्रमानुसार दुसऱ्या मतादार कुटुंबाकडे किंवा प्रतिनिधि मतादाराकडे गेली पाहिजे.

२२. कलेक्टरनें तसा निदेश दिला असतां जर केवळ एकच असलेला प्रतिनिधि मतादार हा जातीनें काम करण्यास नकार देईल किंवा निकटपूर्वीच्या कलमाच्या उपबंधानुसार त्याचा दुय्यम म्हणून योग्य इसमास नेमण्यांत कसूर करील तर कलेक्टरनें दुय्यम इसमाची नेमणूक केली पाहिजे. कलेक्टरनें दुय्यम इसमाची नेमणूक केंव्हां करावयाची तें.

कलेक्टरनें अशा रीतीनें दुय्यम म्हणून नेमलेला इसम हा, सामान्यतः, ज्या गांवासाठीं त्याची नेमणूक झाली आहे अशा गांवाच्या मतादार कुटुंबाचा सदस्य असला पाहिजे, परंतु अशा कुटुंबाचा कोणताहि सदस्य योग्य नसल्यास किंवा त्या जागीं त्याची काम करण्याची इच्छा नसल्यास, इतर कोणत्याहि इसमास नेमण्याचा अधिकार आहे. दुय्यम इसम हा सामान्यतः मतादार कुटुंबाचा सदस्य असला पाहिजे.

अपात्र प्रतिनिधि मतादारास दुय्यम इसम नेमण्याचा नसेल-तेव्हांची कार्यरीति.

२२ अ. पदावरील हक्क उपभोगण्याची ज्याची पाळी आहे असा प्रतिनिधि मतादार, कलम ३०, पोट-कलम (१) कंडिका (फ), (ग) किंवा (ह) अन्वयें पदासाठीं अपात्र ठरेल तेव्हां अशा प्रतिनिधि मतादारानें दुय्यम इसम नेमण्यांत कसूर केली आहे असें समण्यांत आलें पाहिजे आणि यथास्थिति, पदावरील (हक्काची) पाळी ही कलम २१ अनुसार ठरविण्यांत आली पाहिजे किंवा कलम २२ अनुसार कलेक्टरनें दुय्यम इसमाची नेमणूक केली पाहिजे.

वैधरित्या अपात्र असलेल्या मतादाराच्या वतीनें पालकास काम करण्याचा अधिकार.

२३. जर मतादार हा अठरा वर्षांहून कमी वयाचा असेल किंवा वेडेपणामुळें किंवा दुर्बल मनामुळें असमर्थ झाला असेल तर त्याच्या पालकास किंवा त्याच्या इतर वैध पालकास, कलमें १६, १७, २० व २१ मध्यें तरतूद केलेल्या बाबींपैकीं कोणत्याहि बाबतींत त्याचे वतीनें काम करण्याचा अधिकार आहे.

केवळ एकाच प्रतिनिधि मतादाराचा व त्या जागीं कामकरणाऱ्या निवडलेल्या इसमाचा पदावधि

२४. केवळ एकाच प्रतिनिधि मतादाराचा पदावधि हा, जर प्रतिनिधि मतादार मध्यंतरी पदासाठीं अपात्र झाला नाहीं तर, प्रतिनिधि मतादार हयात असेपर्यंत चालू राहिला पाहिजे.

कलम १७ अन्वयें निवडलेल्या इसमाचा पदावधि हा, पांच वर्षांसाठीं असेल किंवा निवडलेला इसम मध्यंतरी मरण न पावल्यास किंवा पदासाठीं अपात्र न झाल्यास, त्याचा पदावधि निवडणुकीच्या वेळीं बहुसंख्य मतादारांनी विनंति केली असेल अशा अधिक मुदतीपर्यंत चालू राहील कलम १७ अन्वयें मतादारांनी निवडून दिलेल्या कोणत्याहि इसमाच्या पदावधिसंबंधीं मतादारांनी केलेली विनंति, नामनिर्देश करण्यासाठीं असलेले कलम १८ या अन्वयें विहित केलेल्या नियमांनुसार निश्चित केली पाहिजे.

पदावर हक्क असणारा प्रतिनिधि मतादार याची निवडणूक न झाल्यास पदाची मुदत ठरविणें.

२५. कलम १७ अन्वयेंची निवडणूक न झाल्यामुळें, ज्या मतादार प्रतिनिधीकडें पदावरील हक्क निहित आहे अशा प्रतिनिधि मतादाराचा पदावधि हा—

(अ) जेव्हां प्रतिनिधि मतादारांची संख्या नऊपेक्षां अधिक असेल तेव्हां पांच वर्षे असला पाहिजे ;

(ब) जेव्हां प्रतिनिधि मतादारांची संख्या चारहून अधिक परंतु नऊपेक्षां अधिक नसेल तेव्हां सात वर्षे असला पाहिजे ;

(क) जेव्हां प्रतिनिधि मतादारांची संख्या चारहून अधिक नसेल तेव्हां दहा वर्षे असला पाहिजे .

२६. प्रतिनिधि मतादारानें त्याच्याऐवजीं नेमलेला इसम किंवा कलेक्टरानें नेमलेला दुय्यम इसम हा, तो ज्याचेतर्फे किंवा ज्याच्यासाठीं अशा रीतीनें नेमण्यांत आला आहे अशा प्रतिनिधि मतादारांच्या पदाची जी मुदत असेल त्या मुदतीपर्यंतच किंवा अशा पदाची जी मुदत शिल्लक आहे त्या मुदतीपर्यंतच नेमण्यांत आला पाहिजे ; आणि उक्त मुदतींत जर दुय्यम इसम मरण पावेल किंवा राजीनामा देईल किंवा पदासाठीं अपात्र ठरेल तर कलमें २१ व २२ च्या उपबंधानुसार उक्त मुदतीच्या बाकी राहिलेल्या मुदतीसाठीं दुसरा दुय्यम इसम नेमण्याचा अधिकार आहे ;

दुय्यम इसमाची नेमणूक ही त्यांना ज्या इसमांऐवजी नेमण्यात आले आहे त्या इसमांच्या पदावधिपर्यंतच असेल.

परंतु,—

(अ) जो पदासाठीं स्वतः अपात्र ठरल्यामुळें किंवा ज्याची जातीनें त्याजागीं काम करण्याची इच्छा नव्हती म्हणून ज्यानें दुय्यम इसमाची नेमणूक केली आहे अशा प्रतिनिधि मतादाराची पदाची मुदत चालू असतांना कोणत्याहि वेळीं, त्यानंतर त्या जागीं त्याची काम करण्याची इच्छा असेल तर, कलेक्टरास जर तो त्यावेळीं पदासाठीं अपात्र ठरला नसेल तर, तसें करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे ;

(ब) जर प्रतिनिधि मतादार त्याच्या पदाच्या मुदतींत मरण पावेल तर, त्याचे ऐवजी त्याजागीं काम करणाऱ्या इसमानें, जर कोणताहि असल्यास, त्याजागीं काम करणें बंद केलें पाहिजे, आणि प्रतिनिधि मतादाराच्या वारसानें, कलम १९ च्या उपबधांस अधीन राहून, उक्त पदावधीच्या उरलेल्या मुदतीसाठीं जातीनें त्या जागीं काम केलें पाहिजे किंवा त्याचे ऐवजीं त्यानें किंवा कलेक्टरानें, कलमें २०, २१ व २२ च्या उपबधांनुसार, उक्त मुदतीसाठीं दुय्यम इसमाची नेमणूक केली पाहिजे.

२७. यांत यापूर्वी एतद्विरुद्ध कोणतीहि गोष्ट असली तरीहि, ज्या गावांस कलम १५ लागू आहे अशा कोणत्याहि गावांतील कोणत्याहि प्रतिनिधि मतादारास, अशा प्रतिनिधि मतादाराच्या पदावधींतील शेवटच्या वर्षामध्यें, जातीनें त्या जागीं काम करण्यांस परवानगी देतां कामा नये आणि अशा कोणत्याहि गावांत प्रतिनिधी मतादारातर्फे किंवा त्याचेसाठीं कोणत्याहि नव्या दुय्यम इसमाची नेमणूक करतां कामा नये.

प्रतिनिधि मतादाराच्या पदावधींतील शेवटच्या वर्षात त्या जागीं काम करणारा इसम न बदलणें.

अशा कोणत्याहि वर्षात अशा कोणत्याहि गांवांतील त्या जागीं काम करणाऱ्या इसमाच्या जागीं दुसऱ्या इसमाची नेमणूक करणें आवश्यक असेल असा प्रसंग उद्भवल्यास, तें पद रिकामें झालें आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

दु[illegible] नेमण[illegible] श्यक असा [illegible] उद्भवल्यास पद रिक झाल्याचे समजण्यांत यावें.

मामलतदार किंवा महालकरी यांनी त्या जागीं काम करण्यासाठीं इसम तात्पुरते नेमणें.

२८. पाटीलपद रिकामें झाल्यापासून मागील उपबंधांनुसार त्या पदावर नेमणूक होईपर्यंतच्या मध्यंतरीच्या मुदतींत आणि त्याजागीं काम करणारा कोणताहि इसम पदावरून तात्पुरता काढून टाकला असेल अशा मुदतींत, यथास्थिति, मामलतदार किंवा महालकरी यांस, त्यास योग्य वाटेल अशा इसमाची, मग तो त्या गांवच्या मतादार कुटुंबाचा सदस्य असो वा नसो, त्याजागीं तात्पुरती नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

त्या जागीं काम करणाऱ्या इसमांस त्याच्या गैरहजेरींत किंवा आजारीपणांत दुय्यम इसम ठेवण्याचा अधिकार.

२९. त्या जागीं काम करणारा एखादा इसम जर गांवांत तात्पुरता गैरहजर असेल किंवा त्याच्या पदाचीं कर्तव्यें त्यास आजारीपणामुळें कांहीं काळाकरिता पार पाडतां येत नसतील तर त्यास दुसरा एखादा योग्य इसम, मग तो गांवच्या मतादार कुटुंबाचा सदस्य असो वा नसो, उक्त कर्तव्यें पार पाडण्यासाठीं अधिकार आहे; परंतु तो, अशा रीतीनें नियुक्त केलेल्या इसमानें केलेलीं किंवा न केलेलीं कामें नियुक्त करण्याच्या यासाठीं, जणूं तीं त्यानें केलेलीं कामें किंवा वर्जनें आहेत असे समजून जबाबदार असेल.

## पाटील पदासाठीच्या अपात्रता

पदासाठीं कोणतें इसम अपात्र समजण्यांत येतील तें.

३०. (१) पुढील इसम पाटीलपदासाठीं अपात्र आहेत असें समजण्यांत आले पाहिजे :—

(अ) स्त्रिया ;

(ब) अठरा वर्षांखालील वयाचे इसम ;

(क) राज्य सरकारास वेळोवेळीं याबाबतींत विहित करणें योग्य वाटेल अशी शैक्षणिक परीक्षा जर कोणतीहि असल्यास, ती उत्तीर्ण झाला नसेल असा कोणताहि इसम ;

(ड) ज्यानें वयाची ६० वर्षे पूर्ण केलीं असा कोणताहि इसम ; परंतु अशा इसमाच्या नेमणुकीस किंवा तो पदावर राहण्यास कलेक्टरनें खास परवानगी दिली असेल तर त्यास ही अट लागू असणार नाहीं ;

(इ) कलेक्टराच्या मतें जो इसम, वेडेपणामुळें किंवा मानसिक दौर्बल्यामुळें किंवा बहिरेपणामुळें, अंधत्वामुळें किंवा इतर शारीरिक दौर्बल्यामुळें असमर्थ झाला आहे असा कोणताहि इसम ;

(इइ) जमीन महसुलाच्या बाबतींत किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधिअन्वयें जी कोणतीहि रक्कम जमीनमहसुलाची थकबाकी समजून वसूल करतां येईल असें स्पष्टपणें ठरविलें असेल अशा कोणत्याहि रकमेच्या बाबतींत, ती देण्यांत त्यानें जाणूनबुजून कसूरी केली आहे ह्या कारणावरून, कलेक्टरच्या मतें जो इसम पदासाठीं अपात्र असेल असा कोणताहि इसम ;

(फ) संक्षिप्त चौकशी केल्यानंतर ज्यास सामान्यतः वाईट चालीचा इसम म्हणून कलेक्टराकडून ठरविण्यांत आलें आहे आणि त्यास असें प्रकारें ठरविण्यांत आल्यामुळें ज्याची अपात्रता ही, ह्या बाबतींत त्यानें केलेल्या ज्या आदेशान्वयें दूर करण्याचा अधिकार आहे त्या आदेशान्वयें दूर करण्यांत आली नसेल, असा कोणताहि इसम ;

(ग) ज्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपेक्षां अधिक मुदतीची किंवा जन्मठेपेची कैदेची शिक्षा देतां येईल अशा एखाद्या अपराधाबद्दल ज्या इसमास फौजदारी न्यायालयानें कैदेची किंवा फटक्याची शिक्षा दिली असेल व अशी शिक्षा त्यानंतर फिरविण्यांत किंवा रद्द करण्यांत आली नाहीं आणि अशा शिक्षेमुळें पात्र झालेली अपात्रता ही, कमिशनरकडून, जर त्यास योग्य वाटेल तर याबाबतींत जो आदेश देण्याचा त्यास अधिकार आहे अशा आदेशाद्वारें, दूर करण्यांत आली नाहीं असा कोणताहि इसम ;

(ह) कलम ३१ अन्वयें ज्यास पदावरून काढून टाकण्यांत आलें असेल किंवा ज्यास त्याची पुन्हा नेमणूक करण्यासाठीं अपात्र ठरविलें आहे असा कोणताहि इसम ;

परंतु, अशा इसमाची पुन्हा नेमणूक करण्यास कमिशनरनें स्पष्टपणें मंजुरी दिली असेल तर त्यास ही अट लागू असणार नाहीं.

जो आपल्या पदावधींत वरील कारणांपैकीं कोणत्याहि कारणामुळें अपात्र होईल अशा कोणत्याहि दुय्यम इसमास त्याजागीं काम करतां येणार नाहीं.

(२) पोट-कलम (१), कंडिका (फ) किंवा कंडिका (ग) अन्वयें जो कोणताहि मतादार अपात्र ठरला आहे व जोपर्यंत त्याची अपात्रता वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें दूर करण्यांत आली नाहीं तोपर्यंत, त्यास अशा मतादाराचे जागीं काम करणाऱ्या इसमाचे निवडणूकींत मत देण्याचा किंवा त्याजागीं काम करण्यास दुय्यम इसमाची नेमणूक करण्याचा जो हक्क होता त्या हक्काचा उपयोग, करतां येणार नाहीं.

## शास्ति

*मतादार व त्या जागीं काम करणाऱ्या इसमांस दंडाची शिक्षा देणें आणि त्या जागीं काम करणाऱ्या इसमास तात्पुरतें कामावरून दूर करणें किंवा पदावरून काढून टाकणें.*

३१. कलेक्टरनें कलम ११ अन्वयें दिलेल्या कोणत्याहि आदेशाचे पालन करण्यांत जो कसूर करील किंवा आदेशाचें पालन करण्यांस नकार देईल अशा कोणत्याहि मतादारास आणि जो त्याचें कर्तव्य करण्यांत हलगर्जिपणा करील किंवा कसूर करील अशा कोणत्याहि मतादारास किंवा त्याचे जागीं काम करणाऱ्या इसमास अशा प्रत्येक अपराधाबद्दल, पराकाष्टा, अशा मतादाराच्या किंवा त्याच्या जागीं काम करणाऱ्या इसमांच्या वार्षिक उपलब्धीच्या एक-चतुर्थांश भागाइतकी दंडाची शिक्षा देण्याचा कलेक्टरास अधिकार आहे.

ज्या गैरवर्तणूकीबद्दल वर निर्दिष्ट केलेल्या शिक्षेपेक्षां अधिक कडक शिक्षा देणें आवश्यक आहे असें कलेक्टरास वाटेल अशा कोणत्याहि गैरवर्तणूकीचा आरोप, त्या जागीं काम करणाऱ्या इसमांवर करण्यांत आला तर कलेक्टरास, अशा आरोपांची चौकशी चालू असतांना त्यास पदावरून तात्पुरतें दूर करण्याचा अधिकार आहे आणि कलेक्टरास, संक्षिप्त चौकशी केल्यानंतर, त्यास असें वाटेल कीं, त्याजागीं काम करणारा इसम, अशी शास्ति मिळण्याजोग्या गैरवर्तणूकीबद्दल अपराधी आहे तर त्यास पराकाष्टा आणखी सहा महिनें मुदतीपर्यंत पदावरून तात्पुरतें काढून टाकण्याचा अधिकार आहे किंवा लबाडीनें किंवा जाणूनबुजून चूक कागदपत्र तयार केल्याचा किंवा इतर गंभीर स्वरूपाची गैरवर्तणूक किंवा अपराध त्याजविरुद्ध सिद्ध करण्यांत आला तर, राज्य सरकारची आगाऊ परवानगी घेऊन, त्यास पदावरून काढून टाकण्याचा किंवा तो ज्या जागी काम करीत नसेल तर, तो, राज्य सरकारच्या मंजुरीशिवाय परत नोकरी करण्यास अपात्र आहे असें जाहीर करण्याचा अधिकार आहे.

*पदावरू काढून लेल्या निधि दारां अपा*

जेव्हां प्रतिनिधि मतादारास पदावरून अशा रीतीनें काढून टाकण्यांत आले असेल तेव्हां, जर राज्य सरकार तसा निदेश देईल तर यास अन्यथा त्या जागीं काम करणाऱ्या दुय्यम इसमाच्या निवडणूकींत मत हक्क होता तो कोणताहि हक्क त्याजकडून काढून घेण्यांत आला पाहिजे.

**पदावरून काढून टाकल्याचे बाबतींत प्रतिनिधि मतादाराचे हयातीपर्यंतचा हितसंबंध जप्त करणें.**

हया कलमान्वयें कोणत्याहि प्रतिनिधि मतादारास किंवा त्याचे दुय्यम इसमास जर पदावरून काढून टाकले असेल तर, राज्य सरकारास, यथास्थिति, अशा रीतीनें पदावरून काढून टाकलेल्या प्रतिनिधि मतादाराचा किंवा ज्यानें अशा रीतीनें काढून टाकलेल्या दुय्यम इसमाची नेमणूक केली होती अशा प्रतिनिधि मतादाराच्या, सतामधील हयातीपर्यंतच हितसंबंध जप्त करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे.

**त्याजागीं काम करणाऱ्या इसमाची फौजदारी खटल्यांतील जबाबदारी व चौकशी व इन्साफ होईपर्यंत त्यास तात्पुरते कामावरून दूर करणें.**

३२. निकटपूर्वीच्या कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें, जो अपराध केल्याचा त्यावर आरोप करण्यांत आला आहे अशा कोणत्याहि अपराधाबद्दलच्या फौजदारी खटल्यांतील, त्याजागीं काम करणाऱ्या इसमाच्या जबाबदारीवर परिणाम होतो असें समजतां कामा नये; आणि कलेक्टरांस, अशा कोणत्याहि खटल्यांत गुंतलेल्या, त्याजागीं काम करणाऱ्या इसमास, खटल्याची चौकशी व इन्साफ होईपर्यंत, कामावरून तात्पुरते दूर करण्याचा अधिकार आहे आणि निकटपूर्वीच्या कलमान्वयें प्रकरणाची विल्हेवाट लावण्याच्या कारणांसाठीं, चौकशी झाल्यावर अशा चौकशीचें कामकाज व फौजदारी न्यायालयाचा निर्णय, या गोष्टीं आपल्या विचारांत घेण्याचा अधिकार आहे.